# राष्ट्रीय सेवा योजना

# वार्षिक नियमित कार्यक्रम अहवाल
# सत्र 2017 - 2018

## 1) दिनांक 24 ऑगस्ट 2017 :– रा.से.यो. पथक उद्‌घाटन कार्यक्रम

महाविद्यालयातील सत्र 2017–18 च्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचा उद्‌घाटन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास उद्‌घाटक म्हणून ग्रामीण रुग्णालय भिडी (ता. देवळी) येथील समुपदेशक श्री विजय ओझा उपस्थित होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गणेश मालधुरे उपस्थित होते.



उद्‌घाटन सत्र आटोपल्यानंतर लगेचच रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. त्यावेळी उद्‌घाटन श्री. विजय ओझा यांच्याच हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रयोगशाळा तंत्रज्ञ कु. माधुरी भोयर तसेच नोबल शिक्षण संस्था वर्धा येथील कु. सुचिता बोभाटे आणि संध्या म्हैसकर उपस्थित होत्या.

यावेळी मार्गदर्शन करतांना श्री. ओझा म्हणाले की, आज एच.आय.व्ही. एडस बद्दल जनजागृती करण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रत्येकाने आपली एच.आय.व्ही.

तपासणी करुन घेतली पाहिजे. तसेच एच.आय.व्ही. बाधीत व्यक्तींना आधार देऊन त्यांना समजून घेतले पाहिजे. कु. माधूरी भोयर यांनी एच.आय.व्ही. संबंधी आपल्या कर्तव्यांची जाणीव करुन देण्याकरिता उपस्थित विद्यार्थ्यांकडून शपथ म्हणवून घेतली.

अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी म्हटले की, हा आजार आता अलिकडच्या काळात फोफावलेला आहे. परंतु याबाबत आपल्या संतांनी आधीच सांगून टाकले होते. त्यांनी नैतिकतेचा मंत्र जगाला दिला होता. नैतिकतेचे पालन केल्यास या भयंकर आजारापासून समाजाला दूर ठेवता येते. म्हणून संतांची विचारवाणी ही समाजातील सर्व प्रकारच्या दुष्प्रवृत्तींना थांबविण्यासाठी रामबाण उपाय म्हणून कामी येऊ शकतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो.चे. सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे यांनी केले व संचालन स्वयंसेविका कु. कोमल गोमासे हिने केले. कु. प्रणाली जाधव हिने उपस्थितांचे आभार मानले.

## 2) दिनांक 10 सप्टेंबर 2017 :— एक दिवसीय स्वच्छता व उद्‌बोधन शिबीर चिकणी (जामणी)

भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनावरुन स्वच्छता पंधरवाडा या निमित्ताने चिकणी जामणी येथे एक दिवसीय स्वच्छता व उदबोधन शिबीराचे आयोजन करण्यात आले. यात महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाच्या मार्फत गावातील रस्ते झाडणे, कचऱ्याचे ढीग उचलून एका ठिकाणी जमा करुन ठेवणे, प्लास्टीक व तुंबलेल्या नाल्या मोकळया करणे इत्यादी स्वच्छता विषयक कामे करण्यात आली. गावातून मिरवणूक काढून प्रत्येक घरासमोर उभे राहून हागणदारी मुक्तच्या घोषणा देण्यात आल्या व ग्रामस्थांशी संवाद साधण्यात आला. ग्रामपंचायतच्या पटांगणामध्ये मिरवणूक विसर्जित करण्यात आली.




दुपारी 12.00 वाजता अल्पोपाहारानंतर उद्बोधन सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी जागृती व्यसनमुक्ती केंद्र देवळीचे संचालक श्री दादारावजी मून हे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी विविध व्यसने व त्यांचे दुष्परिणाम यांचे विवेचन केले. आज व्यसनाधिनतेमुळे युवा पिढी कशी बर्बाद होत आहे ते सांगून युवकांनी व्यसनापासून दूर राहावे असे सांगितले.

या कार्यक्रमाला श्री. राजुभाऊ होरे सामाजिक कार्यकर्ते (चिकणी) विनोद घोडे (पत्रकार लोकमत), प्राचार्य डॉ. एस.आर. उपाध्याय, एन.एस.एस. विभागीय समन्वयक प्रा. डॉ. जी. व्ही. हेलोंडे, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे, नितीन भोयर, उपसरपंच चिकणी यांचीही उपस्थिती होती. प्रबोधनपीठावरील सर्व अतिथींनी आपले मनोगत व्यक्त केले.

## 3) दिनांक 24 सप्टेंबर 2017 :— राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन आणि युवा वेध सप्ताह उद्घाटन

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिन व युवा—वेध सप्ताहाचे उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. हेलोंडे होते. या कार्यक्रमाला देवळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. दिलीपराव श्रावणजी ठाकुर प्रमुख वक्ते म्हणून हजर होते. ते आपल्या भाषणात म्हणाले की, ''आज आपण स्वच्छतेवर भर देत आहोत''.

आपल्या परिसराची स्वच्छता आवश्यकच आहे. परंतु महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपले चारित्र्य जोपासणे आवश्यक आहे. आज महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या भोवती पर्यावरणाचे प्रदूषण तर आहेच. तसेच सामाजिक राजकीय विचारांचेही प्रदुषण आहे. सोशल मिडियामध्ये समाजामध्ये परस्परांचे गैरसमज वाढविणारे संदेश फिरत असतात. त्यापासून युवकांनी सावध राहावे. मोबाइलचा आवश्यक तेवढाच वापर करावा. आपल्या हातून सायबर क्राइम घडणार नाही याची दक्षता घ्यावी. याप्रसंगी त्यांनी 'पोलीसमित्र' या ॲपविषयीही माहिती दिली.




या कार्यक्रमाला देवळी पोलीस स्टेशनचे सहपोलीस निरीक्षक श्री. गजाननराव दराडे हेही उपस्थित होते. ते आपल्या भाषणात म्हणाले की, युवकांनी समाजात मिसळून समाजाचे प्रबोधन करावे. अडीअडचणीच्या वेळी इतरांच्या उपयोगी पडावे. विद्यार्थ्यांनी आपल्या ठिकाणी सेवाभाव निर्माण करावा. समाजसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन कु. मोनाली पंधरे हिने केले. तर कु. प्रतिक्षा चौधरी हिने उपस्थितांचे आभार मानले.

## युवा–वेध सप्ताह कार्यक्रम पत्रिका

## (दि. 24 सप्टेंबर ते 01 ऑक्टोबर 2017)

| दिनांक | कार्यक्रम | वेळ | विषय |
|---|---|---|---|
| 24/09/2017 | रासेयो स्थापना दिन व युवा वेध सप्ताह उद्‌घाटन कार्यक्रम | सकाळी 10.00 वाजता | ––– |
| 25/09/2017 | निबंध स्पर्धा | सकाळी 10.30 ते 11.30 | बेटी धनाची पेटी |
| 26/09/2017 | वाद विवाद स्पर्धा | सकाळी 10.30 ते 11.30 | नोटा बंदीमुळे झालेला परिणाम (चांगला–वाईट) |
| 27/09/2017 | पोस्टर/स्लोगन स्पर्धा (वाक्यप्रचार स्पर्धा) | सकाळी 10.30 ते 11.30 | स्वच्छ भारत–समृध्द भारत |
| 28/09/2017 | वक्तृत्व स्पर्धा | सकाळी 10.30 ते 11.30 | खरे संत कोण |
| 29/09/2017 | भावगीत स्पर्धा | सकाळी 10.30 ते 11.30 | मराठी, हिंदी भावगीत, कविता |
| 30/09/2017 | दसरा सुट्‌टी | | |
| 01/10/2017 | समारोपीय कार्यक्रम व प्रमाणपत्र वितरण | सकाळी 10.30 | |

## 4) दिनांक 25 सप्टेंबर 2017 :– शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त विशेष श्रमदान

दिनांक 21 ते 29 सप्टेंबर दरम्यान साजरा करण्यात आलेला नवरात्र उत्सव देवळी येथे विविध संघटना साजरा करतात. या उत्सवा दरम्यान भाविकांसाठी अनेक दानशूर व्यक्ती लंगरच्या माध्यमातून खाण्यापिण्याच्या वस्तू मोफत वाटतात. सायंकाळच्या वेळी चालणाऱ्या या लंगरमध्ये प्लास्टीकच्या प्लेटस आणि वाट्‌यांचा मोठया प्रमाणात वापर होतो. खाद्यपदार्थ खाल्ल्यानंतर रिकामी प्लेटस आणि वाटयांचा मोठया प्रमाणात

वापर होतो. त्याचा प्रचंड कचरा गावात पसरला जातो. हा प्लास्टीक कचरा असल्याने त्याचा पर्यावरणाला प्रचंड धोका निर्माण होतो. हा धोका विचारात घेऊन रा.से.यो. विभागाने हा कचरा संकलित करण्याचा निर्णय घेतला. याकरिता स्वयंसेवक – स्वयंसेविकांचे दहा गट तयार करण्यात आले. सायंकाळी 6 पासून रात्री 10 वाजेपर्यंत हे गट गावात फिरुन कचरा संकलित करत होते व जाळत होते.

दि. 25/09/2017 ला संध्याकाळी 7.00 ते 9.30 पर्यंत एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, ग्रामीण रुग्णालय भिडी (ता. देवळी) द्वारा एच.आय.व्ही. क्षयरोग व यौवनसमस्या या रोगासंबंधी नवदुर्गा मंदिर देवळीच्या पटांगणात पोस्टर लावून स्वयंसेवकांनी मंदिरात येणाऱ्या भाविकांचे प्रबोधन केले व काही औषधे मोफत वाटण्यात आली. एज्युकेशन, कम्युनिकेशन इन्फरमेशन हा उपक्रम राबविण्यात आला याकरिता भिडी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय समुपदेशक श्री. विजयजी ओझा यांचे मार्गदर्शन लाभले.

## 5) दिनांक 01 ऑक्टोबर 2017 :– युवावेध सप्ताह समारोपीय कार्यक्रम

दि. 24 सप्टेंबर ते 29 सप्टेंबर 2017 या दरम्यान आयोजित केलेल्या युवा–वेध सप्ताहाअंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या आणि प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रा.डॉ. युवराज खोटेले यांच्या हस्ते प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमाला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गणेश मालधुरे, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. संतोष मोहदरे, प्रा. विवेक देशमुख, प्रा. वंदना तलमले, रा.से.यो.चे बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री. पंकज नेहारे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. करिश्मा मुनेश्वर हिने केले.

## 6)    दिनांक 02 ऑक्टोबर 2016 :— शांतीदिन कार्यक्रम




महात्मा गांधी जयंती दिवस हा जागतिक अहिंसादिन व शांतीदिन म्हणून पाळण्यात येतो. या दिवशी महाविद्यालयात स्वच्छता परिसराचा कार्यक्रम घेण्यात येतो. तसेच वर्धा येथील यशवंत महाविद्यालय ते सेवाग्राम पदयात्रा काढण्यात येते. या पदयात्रेत कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे, प्रा. प्रशांत कुमरे व 20 स्वयंसेवक/स्वयंसेविका यांनी भाग घेतला. पदयात्रा सेवाग्राम आश्रमात पोहोचल्यानंतर आश्रमामध्ये गांधी जयंतीच्या मुख्य कार्यक्रमामध्ये प्रा. मिलींद बोकील व सामाजिक कार्यकर्त्या मेघा पाटकर यांची व्याख्याने झाली. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. आश्रमाचे व्यवस्थापक श्री. जयंत मठकर यांनी आश्रमाची माहिती करुन दिली. विद्यार्थ्यांनी गांधी चित्रप्रदर्शनीला भेट दिली व कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी आश्रमामध्ये स्वयंसेवी संघटनांनी मोफत नेत्रशिबीर आयोजित केलेले होते. त्याचाही विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## 7)    दिनांक 26/11/2017 :— संविधान दिन कार्यक्रम

दि. 26 नोव्हेंबर 2017 ला संविधान दिनानिमित्त प्रा.डॉ. दबडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रम प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गणेश मालधुरे यांनी करुन दिला. प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय हे कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजना सह कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे यांनी प्रारंभी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन करुन घेतले.



2.12.2016

पुण्यनगरी

मार्गदर्शन केले. संचालन अमर कांबळे यांनी केले.

## रासेयोच्या वतीने संविधानदिन

देवळी : येथील एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा. दिलीप दबडे, प्रा.डॉ. मालघुरे, प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांनी मार्गदर्शन करताना संविधान दिनाचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. कार्यक्रमाचे संचालन मोनाली पंधरे यांनी केले. उपस्थितांचे आभार रजत मसराम यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच रासेयो पथकाचे स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. दिलीप दबडे आपल्या व्याख्यानात म्हणाले की, ''भारतीय समाज विविध जाती जमातीमुळे बनला आहे. त्यात विविधताही भरपूर आहे. तशीच विषमताही आहे. जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेली विषमता संविधानातील विविध तरतुदींच्या माध्यमातून नष्ट होण्यास मदत होईल. नवीन विषमतामुक्त भारतीय समाज निर्माण होईल.

कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेविका कु. मोनाली पंधरे यांनी केले. तर श्री रजत मसराम यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक – शिक्षकेत्तर वर्ग तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विद्यार्थी बहुसंख्येने हजर होते.

## 8) दिनांक 05 डिसेंबर 2017 :– विशेष व्याख्यान – स्वामी विवेकानंदांचा युवकांना संदेश




दि. 5 डिसेंबर 2017 ला रा. से.यो. तर्फे प्रा.डॉ. रघुनाथ भालेराव (कोल्हापुर) यांचा स्वामी विवेकानंदांचा युवकांना संदेश या विषयावर विशेष व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्वामी विवेकानंदांच तत्त्वज्ञान निर्भय बनविणारे आहे. त्याकरिता आपणांकडे सत्यनिष्ठा, बलोपासना हवी. आधुनिकतेचा स्वीकार करावा. विवेकानंदांनी मुख्यत्त्वे आध्यात्मिक तत्त्वज्ञान सांगितले असले तरी त्यांनी सामाजिक सुधारणेचाही पुरस्कार केलेला आहे. तसेच पाश्चात्यांचे विज्ञान व भारतीयांचे अध्यात्म यांचा मिलाफ केला तरच मानवजात सुखी होईल असा विवेकानंदाचा संदेश होता असे त्यांनी सांगितले प्रा. भालेराव हे स्वामी विवेकानंदप्रणित रामकृष्ण मिशनमधील ज्येष्ठ विचारक आहेत.



epaper.deshonnati.com

**तरुणांनी आत्मविश्वासपूर्ण असावे : डॉ. भालेराव**

तालुका प्रतिनिधी/ १५ डिसेंबर

देवळी : तरुणांनी आत्मविश्वासपूर्ण असावे. ज्याचा स्वतःवर विश्वास आहे तोच आस्तिक म्हणावा असा विवेकानंदाचा विचार आहे, असे मत डॉ. रघुनाथ भालेराव यांनी मांडले.

स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित प्रबोधनपर व्याख्यानात ते बोलत होते. स्वामी विवेकानंदाचे तत्वज्ञान निर्भय बनविणारे आहे. त्याकरिता आपणाकडे सत्यनिष्ठा हवी, बालोपासना हवी, आधुनिकतेचा स्वीकार करावा. विवेकानंदांनी मुख्यत्वे आध्यात्मिक तत्वज्ञान सांगितले असले तरी त्यांनी सामाजिक सुधारणांचाही पुरस्कार केला आहे. तसेच पाश्चात्यांचे विज्ञान व भारतीयांचे आध्यात्म यांचा मिलाप केला तरच मानवजात सुखी होईल, असा विवेकानंदांचा संदेश होता, असे भालेराव यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मोहदरे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गणेश मालधुरे होते. कार्यक्रमाचे संचालन कोमल [illegible] हिने केले. पंकज नहारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संतोष मोहदरे यांनी केले. प्रा.डॉ. मालधुरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ते आपल्या भाषणात म्हणाले की, हिंदुधर्मात अनेक आचार्य झाले असले तरी विद्यमान काळात स्वामी विवेकानंदांच्याच विचारांची देशाला गरज आहे. स्वामी विवेकानंदांचा वेदांत हा काळानुरुप सुधारणांची जोड दिलेला वेदांत आहे. स्वामी विवेकानंदच युवकांचा आदर्श असणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे संचालन कु. कोमल गोमासे यांनी केले. श्री. पंकज नेहारे यांनी सर्वांचे आभार मानले.

## 9) दिनांक 09 डिसेंबर 2017 :– देवळी नगर स्वच्छ सर्वेक्षण 2018



2018 मध्ये होणाऱ्या देवळी नगर स्वच्छ सर्वेक्षण मोहिमे अंतर्गत देवळी नगर परिषदेने दि. 09/12/2018 ला सकाळी 6.00 ते 9.00 या वेळेत खासदार श्री. रामदासजी तडस यांच्या नेतृत्वात मिरणनाथ महाराज यात्रा परिसर स्वच्छतेचा कार्यक्रम आयोजित केला होता. यात देवळी नगर परिषदेचे सर्व कर्मचारी सहभागी झाले होते.

या स्वच्छता मोहिमेत एस.एस.एन.जे. महाविद्यालयाच्या रा.से.यो. पथकाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व मिरणनाथ यात्रा पटांगण परिसराची स्वच्छता केली.

## 10) दिनांक 12 डिसेंबर 2017 :– आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

जिल्हाधिकारी वर्धा यांचे पत्र क्र. जि.आ.व्य.अ./एस.डी.आर.एफ./कावि–536/2016 दि. 05 डिसेंबर 2016 नुसार उपरोक्त तारखेला आमच्या महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम (कार्यशाळा) घेण्यात आली. त्याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे (SDRF) श्री. सुरेशजी कराडे (PI) श्री. प्रकाशजी नेमाने (PSI) उध्दवजी केंद्रे (PSI) डॉक्टर आनंद झाडे, डॉ. प्रकाश सहारे त्यांची चमू या कार्यशाळेकरिता उपस्थित होते. देवळीच्या तहसीलदार तेजस्विनी जाधव, नायब तहसीलदार बालूताई भागवत यांचीही कार्यक्रमाला उपस्थिती होती.



प्रारंभी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे पोलीस निरीक्षक श्री सुरेशजी कराडे, तहसीलदार तेजस्विनी जाधव, प्रा.कॅ. मोहन गुजरकर यांची मार्गदर्शनपर भाषणे झालीत.

त्यानंतर श्री सुरेशजी कराडे यांनी रस्त्यावरील अपघाताच्या वेळी कोणते प्रथमोपचार करता येतात त्याची माहिती दिली. श्री. विजय काकडे यांनी पूर परिस्थितीमध्ये लोकांचे जीव कसे वाचवावे त्याकरिता कोणकोणती साधने वापरता येतात याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. अपघाताचे वेळी बँडेज कसे बांधावे त्याचे विविध प्रकारची प्रात्यक्षिके श्री. रोषण बावणे यांनी करुन दाखविली.



देशोन्नती शहर १४-१२-२०१६

## आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण युवावर्गास आवश्यक : तेजस्विनी जाधव

### एनसीसी छात्रसैनिक, रोव्हर्स, रेंजर्स, रासेयो स्वयंसेवकांचा उत्स्फुर्त सहभाग

*शहर प्रतिनिधी/ १३ डिसेंबर*

देवळी : 'आतंकवाद,दहशदवाद व असुरक्षित वातावरण असल्यामुळे केव्हाही कोणतिही आपत्ती येवू शकते.आपत्ती सूचना न देता येत असते. अशावेळी केवळ पोलीस व सैन्यदलावर अवलंबून न राहता सुजान नागरिकांनी समोर येण्याची गरज आहे. यासाठी कर्तव्यतत्पर, साहसी, समयसुचकता व राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या युवा पिढीची आपल्या देशाला नितांत गरज आहे. या दृष्टीकोनातून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण युवावर्गास आवश्यक आहे, असे प्रतिपादन स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेस मार्गदर्शन करताना देवळीच्या तहसिलदार तेजस्विनी जाधव यांनी १२ डिसेंबर रोजी केले. स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यालयात राज्य आपत्ती प्रबंधन दलातर्फे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात एन .सी. सी.छात्र सैनिक, रा.से.यो. स्वयंसेवक, रोव्हर्स, रेंजर्स व महाविद्यालयातील तरूण-तरूणींनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुरेश उपाध्याय तर प्रमुख अतिथी म्हणून तहसिलदार तेजस्विनी जाधव, नायब तहसिलदार बाळुताई भागवत, राज्य आपत्ती प्रबंधन दलाचे पोलिस निरीक्षक सुरेश कराळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गणेश मालधुरे, स्कॉऊटचे जिल्हा आयुक्त तथा एन.सी.सी.अधिकारी कॅप्टन प्रा. मोहन गुजरकर उपस्थित होते. प्राचार्य डॉ.उपाध्याय म्हणाले युवापिढीत प्रचंड क्षमता असून त्यांच्या शक्तीचा योग्य सदुपयोग झाल्यास सुरक्षित वातावरण निर्माण हावू शकते. या दृष्टिकोनातून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आवश्यक आहे. तर पोलिस निरीक्षक सुरेश कराळे यांनी कार्यक्रमाचे संचालन करून आपत्ती व्यवस्थापनाचे महत्व पटवून दिले.

यावेळी घरगूती वस्तूंपासून पूर प्रसंगी पाण्यात स्व:ताचा बचाव कसा करता येईल याचे प्रात्याक्षिक दाखविण्यात आले.याशिवाय रबर बोटचा वापर, आगीतून बचाव व रिव्हर क्रासिंगचे प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. यशस्वीतेकरिता पोलिस उप निरीक्षक नेमाने, हवालदार हारगुडे, पोलिस कर्मचारी ढवळे, काकडे, अन्नापूरे, शिरामे, वारके, परचाके, आर.पी.सिंग, महाविद्यालयाचे एन सी.सी.छात्रसैनिक व राज्य आपत्ती प्रबंधन दलाच्या जवानांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाची सांगता 'हम सब भारतिय है' या एन. सी. सी. गीताने झाली.कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

उंच इमारतीमध्ये अडकून पडलेल्या लोकांची सुटका कशी करावी याची प्रात्यक्षिके राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या चमुने करुन दाखविली. ही प्रात्यक्षिके महाविद्यालयाच्या सर्वात उंच जागेवरुन जमिनीपर्यंत दोराच्या साहाय्याने करुन दाखविण्यात आली. ही प्रात्यक्षिके चित्तथरारक होती.

## 11) दिनांक 07 जानेवारी 2018 :—



डिगडोह (ता. देवळी) येथे नागनाथ महाराज यात्रा उत्सवानिमित्त एक दिवसीय ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे सरपंच ज्योतीताई जुगनाके, उपसरपंच चंद्रदीप देढे, विपुल ताडाम, प्रवीण येसनखेडे, श्री. प्रशांत कुमरे व रा.से.यो.चे विद्यार्थी यांनी भाग घेतला.



**दिगडोह येथे स्वच्छता अभियान उत्साहात**

देवळी : दिगडोह येथे नागनाथ महाराज यात्रा उत्सवा निमित्त ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. देवळी येथील एसएसएनजे महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक वर्गासह दिगडोह ग्रामपंचायतच्या सरपंच ज्योती जुगनाके, उपसरपंच चंद्रदिप देढे, विपुल ताडाम, प्रवीण येसनखेडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गणेश मालधुरे, प्रशांत कुमरे इत्यादींनी सहभाग घेऊन सर्वप्रथम यात्रा मैदानाची स्वच्छता केली. नंतर संपूर्ण गाव स्वच्छ करण्यात आले. उत्तमराव जुगनाके, अंकूश बतकल, सुधीर कापसे, वैभव वाघ यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक, उत्साही तरुण व युवतींसह महिलांनी सहभाग नोंदविला. ग्रामस्वच्छता कार्यक्रम आटोपल्यानंतर नागनाथ महाराज मठ परिसरामध्ये रामकथाकार शेषरावजी गोहटे महाराज यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सर्वसंत मंडळी, ग्रामस्थ पदाधिकारी, मुख्यमंत्री दुत कुणाल भामरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम यात्रा मैदानाची स्वच्छता केली. नंतर संपूर्ण गाव स्वच्छ करण्यात आले. उत्तमराव जुगनाके, अंकुश बदखल, सुधीर कापसे, वैभव वाघ यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक, उत्साही तरुण व युवतीसह महिलांनी सहभाग नोंदविला. ग्रामस्वच्छता कार्यक्रम आटोपल्यानंतर नागनाथ महाराजमठ परिसरामध्ये रामकथाकार शेषराव गोहटे महाराज यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाला सर्व संत मंडळी, ग्रामस्थ पदाधिकारी, मुख्यमंत्री दूत श्री कुणाल भामरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## 12) दिनांक 29 जानेवारी ते 05 फेब्रुवारी 2018 :–

देवळी तालुक्यातील डिगडोह येथे 29 जानेवारी ते 5 फेब्रुवारी 2018 ला विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर घेण्यात आले. 'स्वच्छतेकरिता युवक' या संकल्पनेवर हे शिबीर आधारित होते. विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीराचा अहवाल याच पुस्तकात स्वतंत्रपणे देण्यात आलेला आहे.

## विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग

दि. 10/09/2017 ला देवळी शहराजवळील चिकणी (जामणी) या खेडेगावात विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिम राबविली. यात एकूण 40 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी ग्रामपंचायतच्या आवारामध्ये समारोपीय कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी व्यसनमुक्ती केंद्र देवळीचे संचालक दादारावजी मून यांचे व्यसनमुक्ती व अंधःश्रध्दा निर्मूलन याविषयी भाषण झाले.

2 ऑक्टोबर हा जागतिक अहिंसा दिवस पाळल्या जातो. यादिवशी वर्धा येथील गांधी पुतळयापासून सेवाग्राम आश्रमपर्यंत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शांती पदयात्रा काढण्यात येते. आमच्या महाविद्यालयातील 20 विद्यार्थ्यांनी या पदयात्रेत भाग घेतला. तसेच सेवाग्राम आश्रमातील मुख्य कार्यक्रमातील मेघा पाटकर व मिलींद बोकील यांची भाषणे ऐकली.

2017–2018 या वर्षात देवळी शहरात स्वच्छ सर्वेक्षण 2018 कार्यक्रम राबविण्यात आला. त्यात दि. 9 डिसेंबर 2017 ला नगर परिषद देवळीचे कर्मचारी व आमच्या महाविद्यालयाच्या रा.से.यो. व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने खासदार रामदासजी तडस यांच्या नेतृत्वात मिरणनाथ महाराज यात्रा पटांगणाची सफाई करण्यात आली त्यात एकूण 100 विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

दि. 24 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर 2017 पर्यंत युवावेध सप्ताह कार्यक्रम घेण्यात आला. त्यात निबंधस्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पोस्टर, स्लोगन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भावगीत स्पर्धा इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण 40 विद्यार्थ्यांनी भाग

घेतला. त्यातील प्रत्येक स्पर्धेत विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय क्रमांकाचे बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले.

दि. 18 व 19 ऑगस्ट 2017 ला जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारा उजनी धरण, जामणी साखर कारखाना ता. सेलू येथे आपत्ती व्यवस्थापन स्वयंसेवक प्रशिक्षण (कार्यशाळा) आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षण कार्यशाळेत आमच्या 20 स्वयंसेवकांनी उपस्थित राहून आपत्ती व्यवस्थापनाचे ट्रेनिंग घेतले. दि. 17 ते 19 फेब्रवारी 2018 ला प्रियदर्शिनी महाविद्यालय वर्धा येथे 'जीवन कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन' या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यात पंकज नेहारे, आदित्य इखार, मोहिनी महाजन, सोनाली डोंगरे यांनी सहभाग घेतला.




दि. 5 मार्च ते 7 मार्च ला रा.से.यो. विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ यांनी आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेत (1) हर्षल राजुजी गायकवाड (2) प्रणाली वासुदेवराव जाधव (3) आदित्य जगदीशराव इखार (4) सोनाली अरविंदराव डोंगरे यांनी सहभाग घेतला.

दि. 25 मे ते 3 जून या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर झाले यात (1) हर्षल गायकवाड (2) सोनाली डोंगरे (3) मोहिनी महाजन (4) आदित्य इखार (5) वैभव कातोरे (6) प्रशांत चन्ने यांनी भाग घेतला व आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेतले.

**प्रा.डॉ. गणेश मालधुरे**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर अहवाल

देवळी तालुक्यातील डिगडोह या रा.से.यो.ने. दतक घेतलेल्या गावी भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत सत्र 2017–2018 चे विशेष निवासी श्रम संस्कार शिबीर 'स्वच्छतेसाठी युवक' या संकल्पनेवर आधारित आयोजित करण्यात आले होते. दि 29 जानेवारी 2018 ते 5 फेब्रुवारी 2018 या कालावधीत हे शिबीर घेण्यात आले. या शिबीरात श्रमप्रतिष्ठेबरोबरच मनातील सृजनता जागृत व्हावी यादृष्टीने विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या तज्ञांना विशेष व्याख्यानांसाठी आमंत्रित करण्यात आले होते. डिगडोह येथील ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट यांच्या सहकार्याने ग्रामस्वच्छता, अंधःश्रद्धा निर्मूलन आरोग्य शिबीर स्त्री भ्रुणहत्या उद्योजकता विकास इत्यादि कार्यक्रम राबविण्यात आले. त्याचा दैनंदिन अहवाल सादर करीत आहोत.

**दिनांक 29 जानेवारी 2018 :–**

सकाळी 10.30 ते 11.30 पर्यंत शिबीरार्थ्यांचे शिबीरस्थळी आगमन झाले. शिबीरार्थ्यांच्या उपस्थितीविषयी नोंदणी करण्यात आली. परस्परांचा परिचय करुन घेतल्यानंतर अल्पोपाहाराचा कार्यक्रम झाला. 12.00 ते 1.00 पर्यंत शिबीर स्थळाची स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर शिबीरार्थ्यांचे सामुहिक डब्बा–जेवन झाले. दुपारच्या विश्रांतीनंतर दुपारी 3.00 ते 6.00 यावेळेत मंच तयार करण्यात येऊन जागेचे, मुक्कामाचे, पिण्याच्या व वापराच्या पाण्याचे नियोजन करण्यात आले. विविध समित्यांची स्थापना करण्यात आली. संध्याकाळी गुरुदेव सेवा मंडळाच्या सहकार्याने सामुहिक प्रार्थना करण्यात आली. पुढील कार्याकरिता गट विभागणी व गटचर्चा करण्यात आली.

**दिनांक 30 जानेवारी 2018 :—**




सकाळी 6.00 ते 7.00 या वेळेत प्रार्थना घेण्यात आली. नंतर 8.00 ते 9.00 या वेळेत गावातून परिचय फेरी काढण्यात आली. यावेळी शिबीरार्थ्यांनी ग्रामस्थांबरोबर संवाद साधला. गावातील श्रमदानाकरिता जागांचे निरीक्षण करण्यात आले. दुपारच्या जेवणानंतर शिबीराच्या उद्घाटनाची तयारी करण्यात आली.



रा.से.यो.शिबीरातून व्यक्तिमत्व विकास :डॉ.सोनटक्के

*तालुका प्रतिनिधी/ ३ फेब्रुवारी*

**देवळी :** राष्ट्रीय सेवा योजना निवासी श्रम संस्कार शिबिरात सहभागी होणे हा विद्यार्थ्यांच्या जीवनातला एक संस्मरणीय अनुभ्व असतो. इथे समूहात राहताना आपोआप एकमेकाला समजून घेण्याची वृत्ती तयार होते. नवनवे अनुभव गाठीशी बांधता येतात. समूह भावना वाढते. आपल्या अंगीच्या उपजत कलागुणांना भरपूर वाव मिळतो. त्यामुळे अशी शिबिरे विद्यार्थ्यांना फायदेशीरच ठरतात. त्यांनी त्यात अवश्य सहभागी व्हावे, असे उद्गार रा.से.यो. जिल्हा समन्वयक डॉ.धनंजय सोनटक्के यांनी काढले.सध्या स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यलय, देवळी येथील रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांचे तालुक्यातील डिगडोह येथे निवासी श्रमसंस्कार शिबिर सुरू आहे.

या शिबिराचे उद्घाटन डिगडोह येथील प्रतिष्ठित नागरीक पांडूरंग कापसे यांच्या हस्ते झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, जे विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले ते खरोखरच भाग्यवान आहेत. जे या शिबिरात सहभागी झाले नाहीत त्यांना य विद्यार्थी जीवनात पुढे केव्हाही अनुभव घेता येणार नाही.. विद्यार्थी गावकऱ्यांचे जे प्रबोधन करतील त्याचा गावालाचा फायदा होईल. या प्रसंगी डिगडोह ग्राम पंचायतच्या सरपंच ज्योती उत्तम जुगनाके ह्या अतिथीमध्ये उपस्थित होत्या. त्यांनी शिबिरार्थ्यांना शिबिराचय यशस्वीतेकरिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची अध्यक्षता एस. एस. एन.जे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश उपाध्याय यांनी केली. त्यांनी विद्यार्थ्यांनी येईल त्या अडचणीला संधी समजून त्याचे सुसीत रुपांतर करावे, असे सांगितले.

या कार्यक्रमाला उपसरपंच चंद्रदीप देठे, माजी उपसरपंच अंकुश बदखल शाळा समितीचे सदस्य हिंमत गाडगे तसेच उत्तम जुगनाके हे उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत सदस्य चित्राा नासरे, सारिका पेंदोर ह्या सुद्धा उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन रजत मसराम यांनी केले तर आकाश बहाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

ठीक 3.30 वाजता प्राचार्य डॉ. एस.आर.उपाध्याय, उद्घाटक श्री. कापसे साहेब, प्रमुख अतिथी डॉ. धनंजय सोनटक्के जिल्हा समन्वयक रा.से.यो. वर्धा यांचे आगमन झाले. त्यांच्यासह सरपंच ज्योतीताई जुगनाके, श्री उत्तमराव जुगनाके, उपसरपंच श्री चंद्रदीप देढे, श्री विलासराव वाघ (माजी सरपंच), श्री धर्मपाल बेंडे मुख्याध्यापक जि.प. प्राथमिक शाळा डिगडोह यांचेही मंचावर आगमन झााले.

दीपप्रज्वलन व पाहुण्यांच्या स्वागताने उद्घाटन समारोहाला प्रारंभ झाला. उद्घाटन समारोहात रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांचे प्रास्ताविक भाषण झाले. तद्नंतर श्री कापसे साहेब प्रोप्रा. शिव कन्ट्रक्शन कंपनी देवळी यांचे

उद्घाटनपर भाषण झाले. त्यांनी शिबीरार्थ्यांकडून विविध अपेक्षापूर्तीची इच्छा केली व शिबीरार्थ्यांचा गावाला फायदाच होईल अशी आशा व्यक्त केली.

आज महात्मा गांधी यांची जयंती होती. त्याचे औचित्य साधून प्रा.डॉ. धनंजय सोनटक्के यांनी आपल्या भाषणातून गांधी विचार प्रणालीचा परिचय करुन दिला. गांधीजींचा श्रमप्रतिष्ठा, सत्य, अहिंसा, अस्पृश्यता निर्मूलन इत्यादी बाबतचा दृष्टिकोन समजावून सांगितला. तसेच रा.से.यो. निवासी शिबीराचे महत्त्वही सांगितले.

संध्याकाळी 7.00 वाजता गावातून गीत–गायन करीत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर शिबीर स्थळाच्या मंचावर शिबीरार्थ्यांनी 'बेटी–बचाव, बेटी–पढाव' या विषयावर नाटिका सादर केली. तसेच विविध गीतगायनाचा कार्यक्रम सादर केला. याला गावातील प्रेक्षकांची भरपूर उपस्थिती होती.

## दिनांक 31 जानेवारी 2018 :–

प्रातःकालीन प्रार्थना करण्यात आली व काही गीते म्हणण्यात आली. प्रशिक्षक प्रा. कुमरे यांनी शिबीरार्थ्यांकडून योगासने करवून घेतली. सकाळच्या नाश्त्यानंतर गावातील शोषखड्डयांचे काम करण्यात आले.




दुपारी 3.00 ते 5.00 यावेळेत डॉ. प्रफुल काळे माजी निदेशक एमगिरी, वर्धा यांचे 'ग्रामीण युवकांना रोजगाराच्या संधीः उपाय व दिशा' या विषयावर मार्गदर्शन झाले. त्यांच्या मार्गदर्शनानंतर त्यांच्यासोबत अनेक विषयावर

शिबीरार्थ्यांची प्रश्नोत्तरे झाली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री ग्रामदूत श्री कुणाल भामरे CMRDF विशेषत्त्वाने उपस्थित होते.

संध्याकाळी 6.00 वाजता गावातून मशाल रॅली काढण्यात आली. यावेळी देशभक्तीपर गीते म्हणण्यात आली. रात्री 7.00 ते 9.00 विद्यार्थ्यांनी हुंडाबंदी, दारुबंदी या विषयावर नाटिका सादर केल्या.

## दिनांक 1 फेब्रुवारी 2018 :—

प्रातःकालीन प्रार्थना करण्यात आली व प्रा. कुमरे यांनी विद्यार्थ्यांकडून योगासने करवून घेतली. सकाळच्या नाश्त्यानंतर गावातील संपूर्ण रस्त्याने साफसफाई करण्यात आली.

सकाळी 10.00 वाजता आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे येथील डॉक्टरांच्या चमूचे आगमन झाले व आरोग्य शिबीराला सुरुवात झाली. या शिबीरामध्ये 150 ग्रामस्थांनी आपली आरोग्य तपासणी करुन घेतली. यात विशेषत्वाने ज्येष्ठ नागरिक व स्त्रिया यांची संख्या जास्त होती. त्यांना मोफत औषधी वाटण्यात आली.




या आरोग्य शिबीराबरोबरच रक्तदान शिबीराचेही आयोजन करण्यात आले होते. यात हर्षल गायकवाड, आकाश बहाळे, शुभम कडू, धीरज डुकरे, प्रशांत चन्ने, अमित खोंडे, पंकज नेहारे, विशाल आदमणे या शिबीरार्थ्यांनी व ग्रामस्थांनी रक्तदान केले.




दुपारी 4.00 ते 5.00 या वेळेत श्री मोहनराव चिचपाने सचिव ग्राहक पंचायत वर्धा यांचे 'ग्राहकांचे हित आणि अ.भा. ग्राहक पंचायत' या विषयावर व्याख्यान झाले व तद्नंतर शेतकऱ्यांशी प्रश्नोत्तरे करत संवाद साधला.

संध्याकाळी 6.00 वाजता गावातून स्फूर्तीगीते गात सायंफेरी काढण्यात आली.

रात्री 7.00 ते 9.00 श्री प्रा.प्रशांत कुमरे व संच यांचे प्रबोधनपर संगीत निरुपण झाले. त्यात त्यांनी संत तुकडोजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या विचाराची मांडणी केली.

## दिनांक 2 फेब्रुवारी 2018 :–




प्रातःकालीन प्रार्थना करण्यात आली व आत्मचिंतनपर भजने म्हणण्यात आली. प्रा. कुमरे यांनी शिबीरार्थ्यांकडून योगासने करवून घेतली. सकाळच्या नाश्त्यानंतर गावातील शोषखड्डयांचे काम करण्यता आले.

दुपारी 3.30 वाजता श्रीमती सुनयना अजात यांचे 'संत गणपती महाराजांचे अंधःश्रध्दा निर्मूलनाचे कार्य' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी महाराष्ट्रातील वारकरी संतांच्या प्रबोधन कार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांच्या



आजोबांनी इंग्रजांच्या काळात विधवेशी विवाह केला. आंतरजातीय लग्ने लावली. त्याचाही सविस्तर इतिहास मांडण्यात आला.

संध्याकाळी 7.00 वाजता गावातून सायंफेरी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मुख्य चौकात पथनाट्ये सादर केलीत.

रात्री 9.00 ते 10.00 विद्यार्थ्यांनी विविध नकलांचे व नृत्याचे कार्यक्रम सादर केले. यातून ग्रामस्थांचे भरपूर मनोरंजन झाले.

## दिनांक 3 फेब्रुवारी 2018 :—

प्रातःकालीन प्रार्थना कार्यक्रम झाला. प्रा. कुमरे यांच्या मार्गदर्शनात योगासने करण्यात आली. सकाळच्या नाश्त्यानंतर स्मशानभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच स्मशानभूमीच्या काठावरील नाल्याची साफसफाई करण्यात आली.




दुपारच्या सत्रात श्री पंकज वंजारे यांचे 'अंधःश्रध्दाःएक सामाजिक रोग' या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी जागृती व्यसनमुक्ती केंद्रांचे संचालक श्री दादारावजी मून हे अध्यक्षस्थानी होते. ते सुद्धा अंधःश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते आहेत त्यांनीही काही प्रात्यक्षिके करुन दाखवून बुवा, महाराज चमत्कार कसे करतात ते उघड करुन दाखविले.

संध्याकाळी 6.00 वाजता गावातून 'गुटखा मुक्ती' हा विषय घेऊन सायंफेरी काढण्यात आली. संध्याकाळी 7.00 ते 9.00 शिबीरार्थ्यांनी विनोदी एकपात्री प्रयोग करुन दाखविले त्यामुळे ग्रामस्थांचे भरपूर मनोरंजन झाले.

**दिनांक 4 फेब्रुवारी 2018 :–**

सकाळी आत्मचिंतनपर प्रार्थना म्हणण्यात आली तसेच तुकडोजी महाराजांची भजने म्हणण्यात आली. रोजच्याप्रमाणे योगासने करण्यात आली.

सकाळच्या नाश्त्यानंतर ग्रामपंचायत ते नागनाथ महाराज मंदिरापर्यंतचा रस्ता झाडून स्वच्छ करण्यात आला. तसेच नागनाथ महाराज यात्रेचे पटांगण झाडण्यात आले.




दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत डॉ. अनिता पाल यांचा मुलीकरिता खास शारिरीक तपासणी कार्यक्रम ठेवण्यात आला. यात गावातील तरुणींनीही आपल्या समस्यांचे डॉक्टरांचेकडून निराकरण करुन घेतले. प्रा. माधुरी देशमुख या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. त्यांनी तरुण वयातील मुलींच्या आहारासंबंधी माहिती दिली.

संध्याकाळी 6.00 ते 7.00 या वेळेत गावातून सायंफेरी काढण्यात आली त्यावेळी राष्ट्रीय कीर्तनकार श्री तुकारामजी घोडे महाराज यांच्या कीर्तनाची घरोघरी जाऊन जाहिरात करण्यात आली.



आज कार्यक्रमाच्या आधी भोजनाचा कार्यक्रम उरकवून घेण्यात आला. रात्री 9. 00 ते 11.00 राष्ट्रीय कीर्तनकार श्री तुकारामजी घोडे यांच्या राष्ट्रीय कीर्तनाचा कार्यक्रम झाला. त्यांनी सर्वधर्म समभाव हा विषय घेऊन भारतातील मुख्य सहा धर्माचे तत्त्वज्ञान सांगितले. ग्रामस्थांनी या कार्यक्रमाला सर्वात जास्त गर्दी केली व दादही दिली.

या कार्यक्रमाला देवळी येथील उद्योजक व ज्येष्ठ समाजसेवक श्री मोहनलालजी अग्रवाल प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनीही आपले 'मनोगत' व्यक्त केले. शेवटी श्री तुकारामजी घोडे महाराज व संच यांचा श्री मोहनलालजी अग्रवाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## दिनांक 5 फेब्रुवारी 2018 :–

सकाळी 6.00 वाजता प्रार्थना कार्यक्रम झाला. यावेळी मुलींनी पहाटेची भक्तिगीते म्हटली. सकाळी 6.30 वाजता गावातून गुरुदेव मंडळाच्या साथीने रामधून फेरी करण्यात आली. त्यानंतर गावातील तुकडोजी महाराजांच्या पुतळयाची आंघोळ करण्यात आली व पुतळयाच्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर नाश्त्याचा कार्यक्रम झाला.

सकाळी 9.00 ते 11.00 पूर्ण गाव परिसर स्वच्छतेचा कार्यक्रम झाला. यावेळी गावातील पांदण रस्त्यांची सफाई करण्यात आली.

दुपारी 3.00 वाजता समारोपाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. श्रीमती नयना गुंडे मुख्य कार्यपालन अधिकारी न.प. वर्धा यांची अचानक बदली झाल्यामुळे त्यांच्या ऐवजी प्रा. केशवराव कुवारे जनता महाविद्यालय देवळी यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले.




यावेळी मंचावर प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय, रा.से.यो. विभागीय समन्वयक प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे, डिगडोह येथील ज्येष्ठ नागरिक श्री सुधाकरराव कापसे, सरपंच ज्योतीताई जुगनाके, उत्तमराव जुगनाके, विनय कापसे, श्री अंकुश बदखल (माजी उपसरपंच) उपस्थित होते.

ग्रामस्थांतर्फे श्री अंकुश बदखल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. शिबीरार्थ्यांतर्फे श्री अभय तेलरांधे यांनी मनोगत व्यक्त केले.



सकाळ TODAY | २

वर्धा, बुधवार, १४ फेब्रुवारी २०१८

## ग्रामसफाईने रासेयो शिबिराचा समारोप

देवळी, ता. १३ : स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयातील रासेयो पथकाचे श्रमसंस्कार शिबिर डिगडोह येथे पार पडले. स्वच्छतेसाठी युवक ही संकल्पना मध्यवर्ती टेऊन शिबिराचे आयोजन केले होते. समारोपीय दिवशी स्मशानभूमी ते नागनाथ महाराज मंदिरपर्यंत रस्त्याची साफसफाई करण्यात आली.

शिबिरादरम्यान, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) यांच्या वतीने आरोग्य व रक्तदान शिबिर, एमगिरीचे निदेशक प्रफुल काळे यांनी स्वयंरोजगारावर मार्गदर्शन केले.

प्रबोधनसत्रात ग्राहक पंचायत, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य, स्वच्छता आदींवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. तुकाराम बोंडे महाराज यांनी [illegible] भजन प्रार्थनेच्या माध्यमातून प्रबोधन केले. यावेळी मोहन अग्रवाल यांची उपस्थिती होती. प्रशांत कुमरे यांनी मनोरंजनातून गाडगेबाबा व तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर माहिती दिली.

समारोपीय कार्यक्रमाला प्रा. केशव कुवारे, प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय, सरपंच ज्योती जुगनाके, उपसरपंच चंद्रदीप देठे, मनोज येवतकर, उत्तम जुगनाके, सुधाकर कापसे, सरपंच पांडुरंग सलाम, माजी उपसरपंच अंकुश बदखल, विपूल ताडाम, विष्णू कापसे, बाळा दांडेकर आदींची उपस्थिती होती. संचालन कोमल गोमासे तर रजत मसराम यांनी आभार मानले.

देवळी : मार्गदर्शन करताना मोहन अग्रवाल.

यावेळी श्री रजत मसराम, श्री पंकज नेहारे, वैभव कातोरे, मोनाली पंधरे, सोनाली डोंगरे, अभय तेलरांधे, विशाल आदमणे, रेणूका वंजारी, प्रतिक्षा चौधरी, प्रशांत चन्ने, कोमल गोमासे, श्री आदित्य इखार यांचा उत्कृष्ट शिबीरार्थी म्हणून अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रा. केशवराव कुवारे व प्राचार्य डॉ. एस.आर. उपाध्याय यांचे समारोपीय भाषण झाले. प्रा. केशवराव कुवारे यांनी गाडगे महाराजांच्या समाजसेवेच्या व्रताचे वर्णन केले.

समारोपानंतर गावातील प्रतिष्ठित मान्यवरांसोबत सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला ग्रामस्थांच्या 'पुन्हा या!' या निमंत्रणाने शिबीराचा समारोप झाला.

रात्री 10.00 ते सकाळी 6.00 वाजेपर्यंत शेकोटीचा कार्यक्रम झाला. दिवस उजाडल्या नंतर सर्वांनी प्रातःकर्मे आटोपून शिबीरातील शेवटचा नाश्ता करुन शिबीरार्थी आपआपल्या गावाला मार्गस्थ झाले.

# शिबीराला मान्यवरांच्या सदिच्छा भेटी

| | | |
|---|---|---|
| डॉ. धनंजय सोनटक्के | – | जिल्हाध्यक्ष रा.से.यो. |
| डॉ. गोपाल हेलोंडे | – | विभागीय समन्वयक रा.से.यो. |
| प्राचार्य एस.आर. उपाध्याय | – | प्राचार्य |
| तेजस्विनी जाधव | – | तहसिलदार देवळी |
| श्री मंगेशजी बारापात्रे | – | गटविकास अधिकारी<br>पंचायत समिती देवळी |
| श्री सतीशजी आत्राम | – | गटशिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती देवळी |
| श्री गणेश शेंडे | – | पत्रकार, देवळी |
| श्री विजय पेटकर | – | गुरुदेव सेवामंडळ कार्यकर्ता |

# आभार

सत्र 2017–2018 या शैक्षणिक सत्रामध्ये आमच्या महाविद्यालयाच्या माध्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागच्या वतीने वर्षभर राबविण्यात आलेले नियमित कार्यक्रम आणि दिनांक 29 जानेवारी ते 5 फेब्रुवारी 2018 या कालावधी मध्ये डिगडोह ता. देवळी या गावामध्ये 'स्वच्छतेसाठी युवक' या संकल्पनेवर आधारित विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये राबविण्यात आलेले विविध कार्यक्रम आणि प्रकल्प यासाठी अनेक घटकांनी, मान्यवरांनी सहकार्य केले.

आमच्या पालक संस्थेचे अध्यक्ष श्री सुरेशभाऊ देशमुख, डिगडोह येथील सरपंच ज्योतीताई जुगनाके, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, ग्रामसेवक मनोज येवतकर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री धर्मपाल बेंडे, ग्रामपंचायतचे शिपाई श्री गणेश डुकरे व आमच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने हे शिबीर उत्तमरित्या पार पडले. सर्वांना धन्यवाद!!!

**प्राचार्य डॉ. एस.आर. उपाध्याय**

**प्रा.डॉ. गणेश मालधुरे**
कार्यक्रम अधिकारी

**प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे**
सहकार्यक्रम अधिकारी

एस.एस.एन.जे. महाविद्यालय, देवळी